# महाराष्ट्र विधानसभा
# दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१७
## (सकाळी १०.०० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील:-**

"राज्यातील शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास (ई.एस.बी.सी.) प्रवर्गांतर्गत मराठा समाजास शासकीय व निमशासकीय सेवा (सरळ सेवा भरतीसाठी) व शैक्षणिक संस्थामध्ये १६ टक्के आरक्षण देणेबाबत महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५ या अधिनियमाची अंमलबजावणी मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयापर्यंत स्थगित करण्यात येणे, मात्र सदर स्थगितीमुळे शासकीय, निमशासकीय सेवेतील भरती करिता प्रचलित आदेशानुसार विहित केलेल्या १०० बिंदु नामावलीचा वापर करुन पदे भरण्याची कार्यवाही करणे, शासकीय सेवेतील रिक्त पदांसाठी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पुर्वी शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणासह मा.उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत खुल्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र उमेदवांरामधुन तात्पुरत्या स्वरुपात जास्तीत जास्त ११ महिन्यांच्या कालावधीकरिता तदर्थ स्वरुपात नेमणूका करण्यात येणे, याबाबत शासनाने ई.एस.बी.सी. अंतर्गत नोकरीमध्ये समाविष्ट उमेदवारांना खुल्या प्रवर्गातून शासन सेवेत घेतल्यास राज्यात अशा उमेदवांराना त्यांचा लाभ होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. मो. आरिफ नसीम खान, राधाकृष्ण विखे-पाटील, पृथ्वीराज चव्हाण, विजय वडेट्टीवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौजे पासपोली (पवई, मुंबई) व तुंगवा येथील न.भू.क्र. ८६, ८७, ११५ पै. तसेच न.भू.क्र. ११७ या मिळकतीचा औद्योगिक प्रयोजनासाठी वापर करणे आवश्यक असताना मे. लार्सन अँड टुर्बो लि. कंपनीने मुंबई महानगरपालिकेची परवानगी घेऊन मिळकतीवर निवासी व वाणिज्य वापराची केलेली बांधकामे, कंपनीने तुंगवा (पवई) येथील औद्योगिक वापराच्या जागेवर २२ ते २४ मजली ८ ते १० निवासी इमारतीचे केलेले बांधकाम, जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकरण (युएलसी) यांची कोणतीही परवानगी न घेता महानगरपालिकेच्या आदेशाने औद्योगिक वापराची सुमारे १ लाख ४००० मीटर जागा परस्पर रहिवाशी वापरासाठी देण्यात येऊन नागरी जमीन व कमाल धारणा अधिनियम,

१९७६ चा भंग करण्यात येणे, सदरहू मिळकतीवरील बांधकामे थांबविण्याचे जिल्हाधिकारी यांनी महानगरपालिकेला कळवूनही कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, विकासक व महापालिकेने नागरी जमीन व कमाल धारणा कायद्याचा भंग करुन शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी शासनास सादर केलेला अहवाल, या प्रकरणासाठी विकासकाने विना परवानगी शेकडो वृक्षांची केलेली कत्तल याबाबत उच्चस्तरीय चौकशी करुन कंपनी व संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई करण्यात न येता लेआऊट मध्ये नवीन इमारतीना मंजूरी दिल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, हसन मुश्रीफ, राणाजगजीतसिंह पाटील, भास्कर जाधव, संदीप नाईक, नरहरी झिरवाळ, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, किसन कथोरे, सुरेश लाड, दिपक चव्हाण, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :**

"कळवा (जि. ठाणे) येथील जुना मुंबई-पुणे व ठाणे-बेलापूर रस्त्यावरील कळवा नाका व आत्माराम पाटील चौक, रेतीबंदर या रस्त्यावरुन नवी मुंबई, ठाणे, भिवंडी, नाशिक, विरार, अहमदाबाद इ. ठिकाणी दररोज हजारो हलक्या व अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे होत असलेली वाहतूक कोंडी ५ ते १० मिनीटांच्या प्रवासासाठी सुमारे ३० ते ४५ मिनिटांच्या कालावधी लागत असल्यामुळे होणारा वेळेचा अपव्यय व आर्थिक नुकसान, वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी ठाणे-बेलापूर मार्गावरील विटावा ते कोपरी दरम्यान खाडीपुलाची उभारणी करुन व कळवा ते आत्माराम पाटील चौक दरम्यानच्या रस्त्याचे रुंदीकरण व सर्व्हीस रोड हे प्रकल्प मार्गी लावण्यासंदर्भात आवश्यक उपाययोजना करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी शासन व एमएमआरडीए प्रशासनाकडे दिनांक १ डिसेंबर, २०१७ रोजी व तद्‌नंतर वारंवार मागण्या करुनही त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी नागरीकांबरोबरच वाहनचालकांमध्ये पसरलेला असंतोष, शासनाने याप्रकरणी वेळीच हस्तक्षेप करुन परिसरात सुरळीत दळवणवळण व नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी त्वरीत उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई पश्चिम उपनगर, मालाड (पूर्व) येथील वाहतूक कोंडी समस्या सोडविण्यासाठी मल्लिका हॉटेल ते बस डेपो गोकुळधाम, हुमेरा पार्क-दिंडोशी या रस्त्याचे रुंदीकरणाचे विकास काम तीन महिन्यात सुरु करण्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी आश्वासन देऊनही, रस्त्याचे काम अद्यापही सुरु झालेले नसणे, परिणामी वाहतूक कोंडीमुळे, मालाड पूर्व, रेल्वे स्थानकावरुन पूर्व भागात, कुरार गाव, दिंडोशी, परिसरात जाण्यासाठी, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ व सामान्य नागरीकांची होत असलेली गैरसोय, सदरहू रस्ता रुंदीकरण करण्याच्या कामात, बाधित ८२ झोपडीधारकांचे, सर्वेक्षण करुन, याबाबतचा अहवाल मुंबई महापालिकेने एसआरए प्राधिकरणास सादर करण्यात येऊनही, अद्याप एसआरए प्राधिकरणाने ८२ झोपडीधारकांचे अन्यत्र पुनर्वसन करुन, सदरहू डी.पी.रोड, रस्ता रुंदीकरणाच्या विकास कामासाठी खुला करुन देणेबाबत, कोणतीच कार्यवाही केलेली नसणे, तसेच मालाड (पूर्व) येथे एकही डायलिसीस सेंटर नसल्यामुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणात होत असलेली गैरसोय, मधुमेह व रक्तदाबामुळे डायलिसीस रुग्णांची संख्या सातत्याने वाढत असल्याने या परिसरात डायलिसीस सेंटर उभारण्याची नागरिकांची होत असलेली मागणी, कुरारगाव, पठाणवाडी येथील महापालिकेचा दवाखाना संक्रमण शिबीरात स्थलांतरीत करुन दिव्या अर्पाटमेंटमधील (त्रिवेणी नगर) जागेत डायलिसीस सेंटर सुरु करुन मल्लिका हॉटेल ते बस डेपो, गोकुळ धाम हुमेरा पार्क दिंडोशी या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(५) **श्री. सुनिल केदार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-**

"नागपूर जिल्ह्यातील अनेक भागांत मुरूम, गिट्टी, माती, रेती या गौणखनिजाचे अनधिकृतपणे उत्खनन सुरू असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या SLP (C) No.१९६२८,१९६२९/२००९ दिपक कुमार वि. स्टेट ऑफ हरियाणा या खटल्यातील आदेशानुसार सदर गौणखनिजाचे उत्खनन करीता मायनिंग लिज (खनिज पट्टा) देते वेळेस पर्यावरण विभागाची मंजुरी न घेता काही ठरावीक व्यक्तींशी संगनमत करून अधिका-यांनी परस्पर खनिजपट्टयाचे केलेले वाटप, तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाच्या अध्यादेशानुसार कोणतीही मायनिंग लिज देण्याच्या अगोदर शासकीय जागेबाबत खनन योजना बनविणे आवश्यक असताना सुद्धा सदर अध्यादेशाचे अधिकाऱ्यांकडून होत असलेले उल्लंघन, तसेच महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांनी दिनांक २९ जुलै, २०१६ रोजी सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना केवळ लिलाव पद्धतीद्वारे शासकीय जागेवर गौणखनिजाची दिलेली परवानगी, परंतु जिल्हाधिकारी, नागपूर यांनी खाजगी जागेमध्ये सुद्धा या प्रकारची परवानगी दिली असल्याचे निदर्शनास येणे, नागपूर जिल्ह्यामध्ये निश्चित मायनिंग झोनच्या (खनिज क्षेत्र) बाहेर कोणतेही गौणखनिज उत्खननाबाबत परवानगी देता येणार नाही असे शासनाचे स्पष्ट

निर्देश असतानांही माहितीच्या अधिकारामध्ये दि.१.८.२०१६ ते ५.१२.२०१७ या कालावधीत नागपूर जिल्ह्यातील सर्व तहसिल कार्यालय व उपविभागीय कार्यालय वगळता फक्त जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेमार्फत एकूण ३६ प्रकरणांमध्ये शासनाच्या नियमांचे उल्लघंन करुन २ लाख २४ हजार ७०० ब्रास गौणखनिज परवानगी दिल्यामुळे शासनाची कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे झालेले नुकसान, त्यामुळे जिल्हाधिकारी नागपूर व संबंधीत अधिका-यांवर तातडीने कारवाई करून त्यांना निलंबित करण्याची आवश्यकता, याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(६) **सर्वश्री. सुभाष पाटील, धैर्यशील पाटील, संजय कदम, भास्कर जाधव, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, रुपेश म्हात्रे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. सुरेश लाड, हसन मुश्रीफ, दिपक चव्हाण, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, ॲड. वारीस पठाण, सर्वश्री. पंकज भुजबळ, इम्तीयाज जलील, प्रा. वर्षा गायकवाड, श्रीमती निर्मला गावित, ॲड. यशोमती ठाकूर, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. डी. पी. सावंत, भारत भालके, कुणाल पाटील, बच्चु कडू, शिरीष चौधरी, डॉ. अनिल बोंडे, सर्वश्री. मोहन फड, विनायकराव जाधव-पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्याच्या अनेक भागात दिनांक ४ डिसेंबर, २०१७ रोजी आलेल्या ओखी चक्रीवादळामुळे किनाऱ्यावरील अनेक भागात अवकाळी पावसामुळे आंबा व काजूवरील मोहोर गळून पडल्याने बागायतदारांचे व सुपारीची साठवणूक करणाऱ्या सहकारी संस्थांची सुपारी भिजल्यामुळे त्यांचे झालेले नुकसान, मासेमारीसाठीचे साहित्य वाहून गेल्यामुळे त्यावर अवलंबून असलेल्या व्यावसायीकांवर ओढवलेले आर्थिक संकट, धूपप्रतिबंधक बंधारे फुटून लाटांचे पाणी नारळी पोफळीच्या बागांमध्ये शिरल्याने अनेक झाडे उन्मळून पडणे, खंडाळे, वाडगाव, सहाण, उसर, वावे तसेच वाघ्रण, परहूरपाडा (ता.अलिबाग, जि.रायगड) आदी ठिकाणी शेतात पाणी साचल्याने कांदा उत्पादनावर झालेला परिणाम, आंबा, काजू नुकसानी बरोबरच अनेक ठिकाणी पावटा, तूर, भात, पेंढया व इतर कडधान्य पीकांचे बऱ्याच प्रमाणात नुकसान होणे, सबब शासनाकडून या नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(७) **ॲड. राहुल कुल, श्री. महेश लांडगे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"दिनांक ०८ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र खाजगी वन

संपादन अधिनियम, १९७५ च्या कलम ६ अंतर्गत मुक्त व कलम २२ (अ) अंतर्गत पुनर्स्थापित जमिनीच्या खरेदी विक्री बाबत धोरणात्मक निर्णय घेऊन जमिनींच्या खरेदी विक्रीवर असलेली सर्व बंधने उठविण्यात आलेली असणे, तथापि, उक्त जमिनीच्या इतर हक्कात असलेले खाजगी वन बाबतच्या नोंदी कायम ठेवणे, शासनाने वन संरक्षण अधिनियम, १९८० नुसार वनेत्तर कामे करण्यास बंदी कायम ठेवून जमिनीच्या खरेदी विक्रीवर कोणतेही बंधन नाही अशी भूमिका स्वीकारलेली असणे, शासनाने सन १९६९ पूर्वी अन्नधान्याचे उत्पादन वाढवण्यासाठी वन विभागाच्या हजारो एकर जमिनी दिलेल्या असणे, सुमारे ५० वर्षांहून अधिक काळ उक्त जमींनी शेतकऱ्याच्या ताब्यात असणे, सदर जमिनी या लहान लहान तुकड्यात विभागलेल्या असल्याने वन विभागास या जमिनीचे संवर्धन करणे शक्य नसणे, या जमिनी वन जमिनी म्हणून वाटप झालेल्या असून अनेक शेतकरी त्या कसत असणे, त्या शेतकऱ्यांच्या जमिनीस वनसंवर्धन अधिनियम, १९६० च्या अधीन राहून विक्री करण्यावरील बंधने उठवल्यास पुणे जिल्ह्यासह राज्यातील हजारो शेतकऱ्यांना लाभ होणे, यामुळेच शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल वाढण्यास मदत होणे, महसूल वनाचे क्षेत्र २१ % वरून ३३ % पर्यंत वाढविण्यासाठी वापरणे शक्य होणार असणे, वन विभागाच्या अडवणूकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

(८) **श्री. अबु आझमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-**

"शिवाजीनगर मुंबई उत्तर पूर्व विभागातील एस.एम.एस. इन्होक्लीन या कंपनीकडून विषारी वायूमुळे होत असलेल्या प्रदुषणामुळे स्थानिक नागरिकांना त्वचा विकार, डोळयांची जळजळ, उलट्या, दमा, अस्थमा या आजारांची लागण होऊन दोन पोलीस कर्मचाऱ्यांसह १३ व्यक्तींचा मृत्यु झाल्याचे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, स्थानिक रुग्णालयातील आकडेवारीनुसार वर्षाला अडीच लाख रुग्ण प्रदुषणामुळे उपचारासाठी येत असून त्यातील हजारो रुग्णांचा प्रदुषणामुळे मृत्यु होणे, कंपनीद्वारे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी, स्थानिक नागरिक, रहिवाशी संघ यांनी वारंवार मा. मुख्यमंत्री, पर्यावरण मंत्री आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्राधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनही कोणतीच कार्यवाही न केल्याने नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, सदरहू कंपनीवर तातडीने कारवाई करून प्रदुषण नियंत्रण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(९) **सर्वश्री. मंगलप्रभात लोढा, नरेंद्र पवार, किसन कथोरे, गणपत गायकवाड, प्रतापराव पाटील-चिखलीकर, योगेश टिळेकर, भिमराव तापकीर, विजय काळे, श्रीमती माधुरी मिसाळ, जगदीश मुळीक, योगेश सागर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता त्यांचा वृध्दापकाळ चांगला जावा, त्यांचे जीवन सुसहय व्हावे, शारिरीक व मानसिक आरोग्य चांगले रहावे, आर्थिक क्षमता, कामाचा हक्क मिळावा याकरिता शासनाकडून ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर करुन मसुदाही तयार करण्यात येणे, या मसुदयानुसार ज्येष्ठांसाठी समुपदेशन केंद्राची योजना, तयार होणा-या गृहनिर्माण प्रकल्पामध्ये ज्येष्ठांसाठी सुविधा, म्हाडा, सिडकोच्या प्रकल्पांत सोयीसुविधा, शासनाच्या निवासी संकुलात वृध्दाश्रम बांधण्याकरीता जागा उपलब्ध करुन देणे, ज्येष्ठ नागरिकांना संरक्षणासाठी वॉर्डन योजना परिणामकारकरित्या राबविणे, जिल्हा व तालुकास्तरावर पोलिसांची मदत वाहिनी सुरु करणे, अशा अनेक योजना या मसुदयात करण्यात येऊन दोन वर्षे होऊनही मसुदयावर शासनाने कृति आराखडा तयार न करणे, यामुळे ज्येष्ठ नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, शासनाने ज्येष्ठ नागरिक धोरणाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.''

(१०) **डॉ. पंकज भोयर, सर्वश्री. राजेश काशिवार, चरण वाघमारे, समिर मेघे, समिर कुणावार, सुधाकर कोहळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत झालेल्या गैरव्यवहारात जिल्हापरिषद, वर्धा यांच्या विकास कामांचे ९५ कोटी रुपयांसह २ लाख ४० हजार खातेदारांचे सुमारे ३५० कोटी रुपये अडकून पडणे, या गैरव्यवहारामुळे रिझर्व्ह बँकेने बँकेचा रद्द केलेला परवाना, परिणामी अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या कर्मचा-यांचे गत अनेक वर्षापासून वेतन प्रलंबित असणे, गोरगरीब शेतकरी, कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक खातेदारांनी त्यांना आवश्यकता पडल्यामुळे त्यांच्या बचत गटातील व मुदत ठेवीतील रक्कमेची मागणी केल्यास बँकेकडून नकारात्मक प्रतिसाद मिळणे, वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे तत्कालीन अध्यक्ष व संचालक मंडळाशी संबंधित इतर शैक्षणिक संस्था, सहकारी साखर कारखाने व सुतगिरणी यांना चुकीच्या पध्दतीने कर्जवाटप करुनही त्याची वसूली न होणे, सदर गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : (क) मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली, पनवेल यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : (क) कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, नागपुर यांचे सन २०१६-२०१७ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(ग) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) महिला व बाल विकास मंत्री** : महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) आदिवासी विकास मंत्री** : शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षांचा अनुक्रमे तेरावा व चौदावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(५) परिवहन मंत्री** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(६) उद्योग, खनिकर्म मंत्री** : (क) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे सन २०१२-२०१३ ते २०१५-२०१६ या वर्षांचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा

एक्केचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा एकोनपन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(७) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** : महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(८) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** : (क) पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा छत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई (महानंद दुग्धशाळा) यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लोकलेखा समितीचा तिसावा अहवाल सादर करणे.**

**चार : मा.समिती प्रमुख, विधानसभा विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव -**

विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

सन्माननीय विधानसभा सदस्य श्रीमती दिपीका संजय चव्हाण यांनी श्री.सुनिल सौंदाणे, तहसिलदार, बागलाण, जि.नाशिक यांचेविरुध्द उपस्थित केलेल्या विशेषाधिकार भंग व अवमानाच्या प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियम १८३(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

**पाच : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**सहा : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**सात : मुख्यमंत्री यांचा म.वि.स नियम ११० अन्वये शासकीय ठराव** :-

**ज्याअर्थी,** भारत सरकारच्या, नागरी विमानचालन मंत्रालयाने, आंतरराष्ट्रीय वाहतुकीकरीता 'सार्वजनिक वापर' या श्रेणी अंतर्गत हवाई वाहतूक सेवेसाठी महाराष्ट्रातील शिर्डी जवळ, मौजे काकडी, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर येथे विमानतळ उभारण्यास 'तत्वत:' मान्यता दिलेली आहे;

**आणि ज्याअर्थी,** नागरी विमानचालन महासंचालनालय, नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी वायुयान अधिनियम १९३४ (१९३४ चा २२) याची कलमे ५ आणि ८ चे पोट कलम (२) यांन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन करण्यात आलेले वायुयान नियम, १९३७ यांच्या भाग अकरा मध्ये अंतर्भूत असलेल्या नियमांस अनुसरुन महाराष्ट्रात "शिर्डी विमानतळ, शिर्डी" याकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांस, 'विमानतळ लायसन-सार्वजनिक वापरार्थ' दिले आहे;

**आणि ज्याअर्थी,** शिर्डी येथील उक्त विमानतळाचे, "श्री साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळ" असे पुनर्नामकरण करणे आणि त्या प्रयोजनासाठी, असा प्रस्ताव नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे पाठविण्यापूर्वी, त्यास राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळविल्यानंतर, नागरी विमानचालन, मंत्रालय, भारत सरकार यांची मान्यता मिळविणे इष्ट वाटते;

**त्याअर्थी,** आता, महाराष्ट्र विधानसभा नियम यांच्या नियम ११० अनुसार, महाराष्ट्र विधानसभा, याद्वारे, शिर्डी येथील उक्त विमानतळाचे "श्री साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळ" असे पुनर्नामकरण करण्याची शिफारस केंद्र सरकारला करीत आहे.

**आठ : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८० - महाराष्ट्र विनियोजन (अधिक खर्च) विधेयक, २०१७.

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अमिन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, पृथ्वीराज चव्हाण, अस्लम शेख, अमर काळे, सुनिल केदार, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, अबु आझमी, डॉ.सतीश पाटील, संदीप नाईक, बाळासाहेब पाटील,

संग्राम जगताप, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, संजय कदम, वैभव पिचड, राणाजगजितसिंह पाटील, हसन मुश्रीफ, हनुमंत डोळस, विजय भांबळे, दिलीप सोपल, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, दिपक चव्हाण, सुरेश लाड, प्रा.विरेंद्र जगताप, श्री.राहुल जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २६ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, अमर काळे, सुनिल केदार, राधाकृष्ण विखे-पाटील, अबु आझमी, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २८ — महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अमिन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, पृथ्वीराज चव्हाण, अस्लम शेख, अमर काळे, सुनिल केदार, राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, अबु आझमी, सतीश पाटील, संदीप नाईक, बाळासाहेब पाटील, संग्राम जगताप, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, संजय कदम, वैभव पिचड, राणाजगजितसिंह पाटील, हसन मुश्रीफ, हनुमंत डोळस, विजय भांबळे, दिलीप सोपल, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, दिपक चव्हाण, श्री.सुरेश लाड, प्रा.विरेंद्र जगताप, श्री.राहुल जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २१ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७२ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अस्लम शेख, वि.स.स.**

**यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७२ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, श्री.अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७२ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(४) (क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७३ - महाराष्ट्र न्यायालय-फी (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७३ - महाराष्ट्र न्यायालय-फी (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमर काळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७३ - महाराष्ट्र न्यायालय-फी (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७३ - महाराष्ट्र न्यायालय-फी (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७३ - महाराष्ट्र न्यायालय-फी (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७३ - महाराष्ट्र न्यायालय-फी (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(५)** (क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७४ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७४ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमर काळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७४ - महाराष्ट्र सहकारी

संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७४ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७४ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७४ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(६)** (क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७५ - महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७५ - महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त

सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमर काळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७५ - महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७५ - महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७५ - महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७५ - महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(७)** (क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७९ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (पाचवी सुधारणा) विधेयक, २०१७.**

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स.**

**यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७९ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (पाचवी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव.)**

नऊ : **श्री. सुनिल प्रभू, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. सदा सरवणकर, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री अजय चौधरी, सरदार तारासिंह, सुनिल शिंदे, ॲड. राज पुरोहित, सर्वश्री मंगेश कुडाळकर, अतुल भातखळकर, अशोक पाटील, संजय केळकर, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री योगेश सागर, राजेश क्षीरसागर, ॲड. पराग अळवणी, डॉ. सुजित मिणचेकर, सर्वश्री मंगलप्रभात लोढा, तुकाराम काते, अमित साटम, सुनिल राऊत, राम कदम, कॅ. आर. तमिल सेल्वन, श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासीपाडे आणि अधिकृत झोपडपट्टीतील रहिवाशी यांना स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने आखलेली उपाययोजना, सर्वसाधारण पात्र झोपडपट्टीवासियांच्या स्थलांतरासाठी शासनाने घ्यावयाचा सकारात्मक निर्णय, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सर्व्हे नं. २३९/१ या वन क्षेत्राची मोजणी करुन अतिक्रमित रहिवाशांचे त्याच क्षेत्रात पुनर्वसन करण्याबाबत दिंडोशी येथील लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१६ व त्यानंतर वारंवार मा. मुख्यमंत्री, मा. वनमंत्री व मा. गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केलेली मागणी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन्य प्राण्यांचा शहरात होणारा मुक्त संचार व त्यावर करावयाच्या उपाययोजना, मुंबई शहरातील नद्या व नाले यांच्या रुंदीकरणामुळे बाधीत होणाऱ्या रहिवाशांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करणे, आशिया खंडातील सर्वात मोठया मुंबईतील धारावी येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याचा शासनाने घेतलेला महत्वाकांक्षी निर्णय व आखलेली उपाययोजना, मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत आठ आमदारांच्या समितीने केलेल्या शिफारशीवर निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, या प्रस्तावावर तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता, मुंबईतील महानगरपालिकेच्या जागेवरील व भाडे करार संपुष्टात आलेल्या जीर्ण इमारतींच्या भाडेकरारांचे नुतनीकरण करण्याची आवश्यकता, राज्यात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ३३ हजार ५०० व इतरांसाठी ६२५० घरे उभारण्याची म्हाडाने आखलेली उपाययोजना, याबाबत करावयाची निर्णयात्मक कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

**दहा : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**सर्वश्री. अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, डॉ पंतगराव कदम, सर्वश्री. शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, गणपतराव देशमुख, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, अब्दुल्ल सत्तार, भास्कर जाधव, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. हसन मुश्रीफ, सुनिल केदार, संदिप नाईक, गोपालदास अग्रवाल, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. मो. आरिफ नसीम खान, सुरेश लाड, अमित देशमुख, दिलीप सोपल, डी. एस. अहिरे, राणाजगजितसिंह पाटील, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री. बबनराव शिंदे, मधुकरराव चव्हाण, राहुल मोटे, डी.पी. सावंत, मकरंद पाटील, राजेश टोपे, बसवराज पाटील, शिवेंद्रसिंह भोसले, वसंतराव चव्हाण, दत्तात्रय भरणे, अमिन पटेल, बाळासाहेब पाटील, ॲड के.सी.पाडवी, सर्वश्री. कुणाल पाटील, संग्राम जगताप, काशीराम पावरा, श्रीमती. दिपीका चव्हाण, सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, हनुमंत डोळस, राहुल बोंद्रे, अवधुत तटकरे, विजय भांबळे, वैभव पिचड, अमर काळे, पांडुरंग बरोरा, अमित झनक, दिपक चव्हाण, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, श्री. शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावीत, श्री. अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, जयकुमार गोरे, संजय कदम, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, धैर्यशील पाटील, अबु आझमी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था, महिलांवरील अत्याचारात झालेली वाढ, गुन्ह्यांचा प्रतिबंध करण्यास शासनास आलेले अपयश, डिजिटल युगात ऑनलाईन फसवणुकीच्या वाढत्या प्रकारामुळे सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवर होणारे अत्याचार, प्रामुख्याने नागपूर व मुंबईतील वाढती गुन्हेगारी, लैंगिक छळ व अपहरणाचे वाढते प्रमाण, ज्येष्ठ नागरिकांवरील वाढते अत्याचार, नागपूर कारागृहात गत तीन वर्षात ३२ कैद्यांचा झालेला मृत्यू, रेल्वेतील वाढत्या गुन्हेगारीमुळे धोक्यात आलेली प्रवाशांची सुरक्षितता, मुंबईच्या भायखळा कारागृहात मंजुळा शेट्ये या महिला कैद्याचा कारागृहातील पोलिसांनीच मारहाण करुन घडवून आणलेला मृत्यू, तसेच सांगली जिल्ह्यात घडलेले कोथळे मृत्यू प्रकरण, तसेच नवी मुंबई, कळंबोली पोलिस स्टेशन येथे कार्यरत असलेल्या ए.पी.आय श्रीमती अश्विनी बोद्रे-गोरे यांचा त्यांच्याच पोलिस अधिकाऱ्यांनी केलेला खून, तसेच नागपूरमधील कुविख्यात गुंड मुन्ना यादवला पकडण्यात नागपूर पोलिसांना अपयश आल्याने पोलीस महासंचालकांनी पोलीस आयुक्त, नागपूर यांना केलेली विचारणा, सागरी व अंतर्गत सुरक्षेच्या उपाययोजना करण्याबाबत शासनाची उदासीनता, मुंबई-ठाणे येथे ४०० हून अधिक असलेली बनावट कॉलसेंटर्स, अवैध दारु, मटका, जुगार यांचे वाढते प्रमाण, मुंबईत वास्तव्य करीत असलेल्या परकीय नागरिकांमार्फत मोठ्या प्रमाणात होत असलेली अमली पदार्थांची तस्करी, पोलिसांची निवासस्थाने व विविध ठिकाणच्या पोलीस स्टेशन्सची झालेली दयनीय अवस्था, गृह विभागातील १३ हजार पदे रिक्त असल्याने पोलिसांवर पडणारा कामाचा वाढता

ताण, त्यात राज्यातील गृहरक्षक दल (होमगार्ड्स) यांच्या समस्यांकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, गेल्या दीड-दोन वर्षापासून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे महासंचालक पद रिक्त असणे, परिणामी देशात घडणाऱ्या भारतीय दंड विधान संहितेअंतर्गत दाखल होणाऱ्या दखलपात्र एकूण गुन्ह्यात महाराष्ट्र राज्य आघाडीवर असणे, तर आर्थिक गुन्हे शाखेकडील यादीनुसार मुंबई सुरक्षित शहराच्या यादीत ४५ व्या क्रमांकावर असणे, साडेतीन वर्षानंतरही डॉ. नरेंद्र दाभोळकर व कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येचा तपास पूर्ण न होणे, तसेच समीर गायकवाड व विरेंद्र तावडे यांच्यासंदर्भात ठोस पुरावे असूनही सनातन संस्थेवरील बंदीबाबत कोणतीही कार्यवाही न करणे, दलितांवरील अत्याचारात झालेली वाढ, दुर्बलांवरील हल्ले रोखण्याची गरज असल्याचे मा. राष्ट्रपतींनी केलेले आवाहन, राज्यातील तुरुंगात मर्यादेपेक्षा अधिक ठेवण्यात आलेले कैदी, तुरुंगातील गैरप्रकारांना आळा घालण्यात आलेले अपयश, देश-परदेशातून आमदारांना जीवे मारण्याची देण्यात आलेली धमकी, शासनाने राज्यातील १३१४ शाळा बंद करण्याचा निर्णय घेऊन "सर्वांसाठी शिक्षण" या उद्देशाला फासलेला हरताळ, शिक्षणाचा हक्क कायद्याचा करण्यात आलेला भंग, परिणामी आदिवासी व ग्रामीण भागात निर्माण झालेला तीव्र असंतोष, या निर्णयाच्या विरोधात विविध संघटनांनी काढलेले मोर्चे, मुंबई विद्यापीठातील अनागोंदी कारभार व निकालात झालेल्या गोंधळामुळे निकालाची कालमर्यादा चुकणे, उपस्थित विद्यार्थ्यांना अनुपस्थित दाखविणे, पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशाचा उडालेला बोजवारा, निकालास होणाऱ्या विलंबामुळे विदेशी शिक्षणाचा झालेला स्वप्नभंग, अनेक मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस येणे, त्यावर कोणतीही कारवाई न होणे, त्यांची होत असलेली पाठराखण, अवैध प्रवासी वाहतूक टॅक्सी व रिक्षा चालकांची दादागिरी मिटरप्रमाणे भाडे न घेणे, ओला-उबेरला लोकांची असलेली वाढती मागणी वाढत्या वाहनांमुळे वाहतुकीची निर्माण झालेली समस्या, राज्यात जवळपास २ लाख अवैध वाहनांच्या वाहतुकीमुळे ४ हजार कोटी रुपयांचा राज्य मार्ग, परिवहन महामंडळाला झालेला तोटा, उत्पादन शुल्क विभागातील रिक्त पदांमुळे शासनाचा बुडत असलेला महसूल, गेल्या तीन वर्षात पोलिस दलाचे आधुनिकीकरणासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी, एकाही आर्थिक वर्षात पूर्णत: खर्च न झाल्यामुळे हा निधी केंद्र शासनास समर्पित करण्याची आलेली पाळी, राज्यातील न्याय वैद्यकप्रयोगशाळेत ४० हजारापेक्षा अधिक प्रलंबित असलेली प्रकरणे, पोलिसांसाठी आर्थिक तरतूद असतांनाही हजारो कोटींची देयके कोषागारातून नामंजूर झालेली असतांना बीडीएस प्रणालीवरील प्राधिकारपत्रे रद्द न करणे, परिणामी निधी शिल्लक असूनही त्याचा खर्च झाल्याचे दिसून येणे व त्याबाबत पोलीस प्रशासनाकडून झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**अकरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना (सूचना क्र. १ ते ३)**

**(१) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी तालूक्याची सन १८७४ मध्ये तसेच सावली तालुक्याची सन १९९२ मध्ये निर्मिती होऊनही अद्यापि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन न होणे, ब्रम्हपूरी व सावली हे दोन्ही तालुके धान उत्पादक म्हणून राज्यात प्रसिध्द असून या ठिकाणी एकही उद्योजक उद्योग सुरू करण्यास तयार नसल्यामुळे बेरोजगारांचे रोजगारासाठी शहराकडे होत असलेले स्थलांतर, प्रत्येक तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन करावे असा शासनाचा निर्णय असतांनाही या दोन्ही ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन न केल्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, परिणामी ब्रम्हपूरी आणि सावली येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(२) श्रीमती ज्योती कलानी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"एम.आय.डी.सी. उल्हासनगर मधील उद्योगांचे व जिन्स उद्योगाचे विषारी रसायन मिश्रीत पाणी वालधुनी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे सर्वदूर दुर्गंधी पसरणे, उल्हासनगरमधील उद्योगांना शुध्दीकरणाची व्यवस्था परवडणारी नसल्यामुळे जलशुध्दीकरणासाठी C.E.P.T. प्लांट उभारण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची होत असलेली मागणी, कल्याण, अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूर शहरातील सांडपाणी S.P.T. शुध्दीकरणाच्या प्रकल्पामधून नदीत सोडण्याची आवश्यकता, उल्हासनगर शहरामधील भूमीगत गटार योजनेसाठी ४५० कोटी रुपये मंजूर होऊनही कामास अद्याप सुरुवात न झाल्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिकिया."

**(३) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"सिंदेवाही (जि. चंद्रपूर) येथील तहसिल इमारत जुनी असून वाढत्या कामकाजाच्या व्यापामुळे सदर इमारत अपुरी पडणे, तालुका स्तरावरील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये एकाच इमारतीमध्ये सुरू करण्याकरिता सिंदेवाही येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी १२ कोटी ३५ लाख रुपयांचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर यांनी शासनास सादर करुन सुमारे दीड वर्षाचा कालावधी होऊनही त्यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, सिंदेवाही येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या प्रस्तावास मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि, चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना (सूचना क्र. ४ व ५)**

**(४) श्री. संदिप नाईक, वि.स.स.**

"**नवी मुंबई क्षेत्रामधील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामासंबंधित मागण्यांचा अधिसूचनेत अंतर्भाव करण्याबाबत**" या विषयावरील **श्री. संदिप नाईक, वि.स.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९५०१५ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.**

"**पन्हाळा व शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील प्राथमिक शाळांच्या इमारतींच्या दुरुस्तीबाबत**" या विषयावरील **श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर व इतर वि.स.स** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९२११९ ला दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्र. ६ व ७)**

**(६) श्री. संजय केळकर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"ठाणे शहरात सुमारे ७० हजार भटके कुत्रे असून दरवर्षी ही संख्या दुप्पटीने वाढत असणे, महापालिका हद्दीत श्वान दंशाच्या अंदाजे ३० घटना घडत असून त्यामुळे अनेकजण जखमी होणे, देशात रेबिजमुळे ३५ हजार नागरिकांचा होत असलेला मृत्यु, श्वान दंशावरील लस अथवा औषधे सहजासहजी उपलब्ध होत नसल्याने रुग्णांच्या नातवाईकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, परिणामी यावर आळा घालण्यासाठी श्वान नसबंदी मोहीम मोठ्या प्रमाणात राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(७) अॅड• पराग अळवणी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईतील अनेक भागात रस्त्यांखालील जलवाहिन्यांचे चेंबर्स व मॅनहोल्स नादुरुस्त

झाले असून काही दिवसांपूर्वी पडलेल्या पावसामुळे एल्फिन्स्टन येथे डॉ. दीपक आमरापुरकर यांचा मॅनहोलमध्ये पडून झालेला मृत्यु, या दुर्घटनेनंतर गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने मॅनहोल्सच्या आत सुरक्षा जाळी बसविण्याची शिफारस केली असतानाही त्याकडे संबंधित विभागाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी सर्व मॅनहोल्सच्या आत सुरक्षा जाळी लवकरात लवकर बसविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : २० डिसेंबर, २०१७

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.